# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ / पौष १, १९४३ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | गृह मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | महसूल मंत्री | |
| (३) | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | |
| (४) | कृषि, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | |
| (५) | रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री | |
| (६) | वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५८**

---

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील सीताफळांवर काळ्या बुरशीचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(१) * ३५५५१ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील सीताफळांवर काळ्या बुरशीचा प्रादुर्भाव होऊन फळांचे नुकसान झाल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाळिंबावरील तेल्या रोगाप्रमाणे सीताफळांवर पडलेल्या काळ्या बुरशीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊन सीताफळांच्या झाडांवरही त्याचा दुष्परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील तीन वर्षापासून या रोगाचे प्रमाण वाढले असल्यामुळे याचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर कायमचा उपाय शोधण्याबाबत तसेच सदर नुकसानाबाबत सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सीताफळावर पडलेल्या बुरशीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. परंतु, सीताफळाच्या झाडावर त्याचा दुष्परिणाम झालेला नाही.
(३) बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणाकरिता विभाग तसेच कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०९.०८.२०२१ रोजी मौजे साकुर्डे येथे कार्यक्रम घेऊन अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सुरळेगांव (ता.गेवराई, जि.बीड) येथील गोदावरी नदी पात्रात अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२) * ३३३४५ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुरळेगांव (ता.गेवराई, जि.बीड) येथील गोदावरी नदी पात्रातील जागेचा स्थानिक लोकप्रतिनिधींनी तहसिलदार यांच्या समवेत पंचनामा केल्यानंतर वाळुमाफियांनी नियमांचे उल्लंघन करुन आधुनिक साधनांच्या सहाय्याने अवैधरित्या वाळूचा उपसा करुन नदी पात्रात दहा ते पंधरा फुटापर्यंत खड्डे केल्याचे निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदी पात्रात वाळू उपसामुळे मोठे-मोठे खड्डे पडले असल्यामुळे एका १७ वर्षीय युवकाचा नदीला पूर आल्यामुळे याच खड्यामध्ये बुडून मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळूची वाहतुक करण्याचा शासनाचा आदेश असताना गेवराई विधानसभा मतदार संघातील राक्षसभुवन येथे वाळू वाहतूक करणारे टिप्पर पकडले गेले असल्याचे दिनांक २६ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपसा व वाहतूकीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतुक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करून अवैध वाळू उपसा बंद करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

(२) नदीला पूर आल्याने १७ वर्षीय युवकाचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडुन मृत्यु झाला आहे.

(३) अवैध वाळू वाहतूक करण्याच्या उद्देशाने आलेल्या एकूण ०५ हायवा/टिप्पर वाहनांवर दंडात्मक कारवाई करून पोलीस स्टेशन, चकलांबा येथे फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(४) गेवराई तालुक्यात अवैध गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता तालुकास्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून, माहे एप्रिल, २०२१ ते माहे ऑक्टोबर, २०२१ अखेरपर्यंत एकूण ५१ प्रकरणांत रू.१,२१,७९,०००/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात 'ई पीक पहाणी' ॲपची सक्ती न करण्याबाबत

**(३) * ३३९५१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझी शेती, माझा सातबारा, मीच नोंदविणार पिक पेरा या शिर्षकाखाली शेतक-यांसाठी ‘ई पीक पहाणी’ ॲप विकसित केले असून या ॲप अंतर्गत शेतकऱ्यांच्या शेताचा सर्व्हे, गट नं., एकूण क्षेत्र, पोटखराब क्षेत्र, शेतातील पीक क्षेत्र याची माहिती ‘ई-पीक पहाणी’ ॲपमध्ये शेतकऱ्यांनी भरुन छायाचित्र अपलोड करणे बंधनकारक असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील बहुतांश शेतकऱ्यांकडे अँन्ड्राईड मोबाईल नसून प्रत्येक गावात नेटवर्क समस्या, वेबसाईट, इंटरनेट सेवेसंदर्भात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी विहित मुदतीत माहिती न भरल्यास सातबारावरील पिकांचा तक्ता निरंक राहत असल्यामुळे शेतकऱ्यांना पिक कर्ज, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान तसेच पिक विमा योजनेच्या अनुदानापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांवर ‘ई-पीक पहाणी’ सक्तीची न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

पीकपेरणीची माहिती भ्रमणध्वनी वरील ॲपद्वारा (Mobile App) गा.न.नं.१२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा “ई पीक पहाणी” कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय महसूली

अधिकारी व प्राधिकारी यांना दि.३०/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. सदर "ई पीक पहाणी" हा कार्यक्रम टाटा ट्रस्टच्या सहकार्याने / मदतीने, त्यांनी विकसित केलेल्या आज्ञावलीद्वारे दिनांक १५/०८/२०२१ पासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे.

ग्रामीण भागामध्ये काही गावामध्ये इंटरनेट सेवेसंबधी अडचणी आहेत. तथापि ई-पीक पाहणी हे मोबाईल ॲप डाऊनलोड करून फक्त एकदा खातेदार यांना नोंदणी करण्यासाठी आणि नोंदणी केलेली पीक पाहणीची माहिती फोटोसह अपलोड करण्यासाठी इंटरनेटची आवश्यकता असते. ई-पीक पाहणी प्रत्यक्ष शेतात जावून ई-पीक पाहणी नोंदविण्याची प्रक्रिया आणि अक्षांश रेखांवश सह फोटो घेण्याची प्रक्रिया ऑफलाईन मध्ये चालते. त्यासाठी इंटरनेटची आवश्यकता भासत नाही.

अँन्ड्राईड मोबाईल फोनच्या उपलब्धतेबाबत दिनांक १५/०८/२०२१ ते दिनांक ३१/१०/२०२१ या अडीच महिन्यात खरीप हंगामात ई-पीक पाहणी अपलोड केलेल्या खातेदारांनी वापरलेले अँन्ड्राईड मोबाईल फोन (स्मार्ट फोन) चा अभ्यास करता ९५% पेक्षा जास्त खातेदारांनी एका फोनवरून ५ पेक्षा कमी खात्यांची ई-पीक पाहणी अपलोड केलेली आहे. त्यावरून वापरण्यात आलेल्या स्मार्ट फोन वर एका कुटूंबातील सदस्यांच्या नावाच्या नोंदणी झाले असल्याची शक्यता आहे. सध्या स्मार्ट फोन च्या उपलब्धतेची अडचण भासू नये म्हणून एका स्मार्ट फोन वरून ५० खातेदार शेतकऱ्यांना नोंदणी करता येईल, अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

कोणत्याही शेतकऱ्यांला काही अडचणीमुळे ई-पीक पाहणी करता आली नाही तर तलाठी स्तरावरून पुर्वीप्रमाणे पीक पेऱ्याची नोंद करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तथापि,कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अचुक पिकांच्या नोंदी गाव नमुना १२ मध्ये होणे आवश्यक असल्याने शेतकरी यांनी स्वतः ई-पीक पाहणी द्वारे पीक पेरा नोंदविणे शेतकरी हिताचे आहे.

(४) शेतकऱ्यांवर “ई-पीक पहाणी” सक्तीची नाही. तथापि, “ई-पीक पहाणी” शेतकऱ्यांनी स्वत: करणे हे त्यांच्याच हिताचे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुर्जी शेंडगाव (ता.अंजनगाव, जि.अमरावती) येथे अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तलाठी यांनी यादीतून वगळल्याबाबत

**(४) * ३४००७ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुर्जी शेंडगाव (ता.अंजनगाव, जि.अमरावती) येथे माहे जुन-जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीने शेती खरडून गेलेली असताना यादीत प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतक-यांनाच तलाठी यांनी वगळले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना वगळणाऱ्या संबंधित तलाठयावर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी तहसीलदार, अंजनगांव यांना दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधित दोषी तलाठयावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहाय्यक यांच्या संयुक्त पथकाने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची सर्वेक्षण पंचनामा यादी ग्रामपंचायत कार्यालयाच्या बोर्डावर प्रसिध्द केली होती. तसेच सदर यादीसंदर्भात आक्षेप असल्यास ते दि.०८/०८/२०२१ रोजी पर्यंत दाखल करण्याचे कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.०५/०८/२०२१ रोजी प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत संयुक्त पथकाने पुन्हा शेतीची पाहणी व पंचनामा करुन प्राप्त आक्षेप विहीत कालावधीत निकाली काढलेली आहेत.

-----------------

# जळगाव जिल्हयातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(५) *३२५४७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी):** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात केळी पिक प्रामुख्याने घेतले जात असून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात काढलेल्या केळी पीक विम्याची संपूर्ण नुकसान भरपाई जवळपास ५० शेतकऱ्यांना अजूनही मिळाली नसल्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांनी दिनांक २७ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने जळगाव जिल्हयातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना केळी पीक विम्याची संपूर्ण नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) आंबिया बहार २०१९-२० मध्ये केळी या फळपिकासाठी जळगाव जिल्ह्यातील ४२,३७७ शेतकऱ्यांनी ५४,३५४.२४ हे. क्षेत्राकरिता सहभाग नोंदविला होता. योजनेतील अटी-शर्ती व महावेध प्रकल्पामार्फत प्राप्त हवामानाच्या आकडेवारी नुसार ४१,५७८ शेतकऱ्यांना रक्कम रु. ३७१.९४ कोटी इतकी विमा नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील एका अल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्कार केल्याबाबत

**(६) * ३२५२३ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील अल्पवयीन मुलीचा अश्लील व्हिडीओ बनवून त्याच्या आधारे या मुलीला धमकावणी करत तिच्यावर २९ जणांनी मागील ९ महिन्यांपासून विविध ठिकाणी सामूहिक बलात्कार केल्याचा गंभीर प्रकार माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरुन मानपाडा पोलिसात गुन्हा दाखल करुन पोलिसांनी आतापर्यंत २ अल्पवयीन आरोपींसह २३ जणांना अटक केली असून उर्वरित ६ आरोपींचा शोध सुरु असल्याचे अप्पर पोलीस आयुक्त यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ९ महिन्यांच्या कालावधीमध्ये २९ जणांनी पिडितेला डोंबिवली, रबाळे, वडवली, बदलापूर या विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप पिडितेने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार आरोपींवर कडक कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, याबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २३.०९.२०२१ रोजी गु.र.क्र. ४९९/२०२१, भा.द.वि. कलम ३७६, ३७६ (२) (एन), ३७६ (३), ३७६ (ड) (अ), पोक्सो कलम ४, ६, १०, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) मानपाडा पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र. ४९९/२०२१ मध्ये २९ आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि ४ विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. एका आरोपीचा शोध सुरू आहे.

(३) पिडीतेने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक २९.०१.२०२१ ते दिनांक २२.०९.२०२१ या कालावधीदरम्यान डोंबिवली (पूर्व), नवी मुंबई आणि मुरबाड येथील विविध ठिकाणी अत्याचार झाल्याचे पोलीस तपासात दिसून आले आहे.

(४) याबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २३.०९.२०२१ रोजी गु.र.क्र. ४९९/२०२१, भा.द.वि. कलम ३७६, ३७६ (२) (एन), ३७६ (३), ३७६ (ड) (अ), पोक्सो कलम ४, ६, १०, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मानपाडा पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र. ४९९/२०२१ मध्ये २९ आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि ४ विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. एका आरोपीचा शोध सुरू आहे. सदर आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सायबर गुन्हेगारींमध्ये झालेली वाढ

**(७) * ३२५५६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल)** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील सात वर्षात स्मार्ट फोन, टॅब व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांचा आलेख देखील वाढत असून जवळपास २३ हजारांहून अधिक सायबर गुन्ह्यांची नोंद पोलिसांकडे दाखल झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक फसवणूक, पासवर्ड हॅक करणे, समाजमाध्यमाद्वारे अश्लिल छायाचित्रांचे प्रसारण करणे, शिवीगाळ, अश्लिल संवाद इत्यादी प्रकरणी सायबर गुन्हे विभागात नोंदणी झालेल्या एकुण २३ हजार ६०१ सायबर गुन्ह्यांपैकी केवळ ५ हजार ९९१ गुन्ह्यांची उकल होऊन त्यापैकी केवळ ९९ आरोपींनाच शिक्षा झाल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे, महाराष्ट्र आणि मुंबई पोलीस यांच्याकडे सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी वेगळी यंत्रणा नसून सामान्य पोलिसांचीच सायबर विभागात बदली करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सात वर्षात केवळ पाच हजार प्रकरणे निकाली निघण्याची कारणे काय आहेत, तसेच उर्वरित १७ हजार ६१० व त्यानंतर अद्यापपर्यंत संख्येत वाढ झालेली प्रकरणे विनाविलंब निकाली काढून यातील आरोपींना शिक्षा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील वाढते सायबर गुन्हे रोखण्यासाठी सायबर पोलीस ठाण्यांची संख्या वाढवणे, तज्ज्ञ कर्मचारी भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात मागील सात वर्षात २५,४६९ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी ६३०६ गुन्हयांची उकल झाली आहे. त्यापैकी एकूण ३८२ प्रकरणे मा.न्यायालयात निकाली निघाली असून त्यामध्ये एकूण ९९ आरोपितांना शिक्षा सुनावण्यात आली आहे.

(३) सायबर पोलीस ठाण्यात काम करण्यास इच्छुक असणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पात्रतेचा विचार करून तसेच ज्या अधिकारी / अंमलदार यांना संगणकाबाबत उत्तम ज्ञान आहे, त्यांना सायबर गुन्ह्यांसदर्भातील

प्रशिक्षण देऊन त्यांची नेमणूक सायबर पोलीस ठाण्यात करण्यात येते.

(४) व (५) सायबर गुन्हयांमध्ये गुन्हेगारांकडून नवनवीन तंत्रज्ञानांचा वापर करून गुन्हे केले जात असून गुन्हयात वापर केलेल्या माध्यमांचे सर्व्हर भारताबाहेर असल्याने त्याबाबत माहिती मिळणे किंवा गुन्हा उघडकीस आणणे हे पोलिसांसाठी आव्हानात्मक असल्याने याचा परिणाम सदर गुन्हयांच्या तपासावर होऊन गुन्हे प्रलंबित राहतात.

राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता ४३ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. तसेच मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याकरीता विविध पोलीस घटकातील एकूण ३२५३ पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. याशिवाय दीर्घकालीन प्रशिक्षणाचा विशेष अभ्यासक्रम तयार करून एकूण १९२२ अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व सायबर पोलीस ठाण्यांना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामग्री, विविध प्रकारचे १६ टूल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत १००० पोलीसांना सायबर गुन्ह्यांच्या तपासात मदत व्हावी यासाठी तज्ञ सल्लागारांच्या मदतीने फॉरेन्सिक टूल्सचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे. सायबर कार्यालयाकडून ऑनलाईन ट्रेंडींग क्राईम्स या विषयावर सोशल मिडीयावर वेबिनार आयोजित करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील देवस्थान, दर्गा, मस्जिद तसेच इनामी जमिनी तेथील खाजगी लोकांनी बेकायदेशीररित्या नावावर करून घेतल्याबाबत

**(८) * ३४६६५ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील देवस्थान, दर्गा, मस्जिद तसेच इनामी जमिनी अशा शेकडो एकर जमिनी तेथील खाजगी लोकांनी महसूल आणि इतर विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने स्वत:च्या नावावर करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन काही जमिनी हस्तांतरित करण्यात आलेल्या असुन सदर जमिनीचे आदेश उपजिल्हाधिकारी (भूसुधार), बीड यांच्या कार्यकाळातील असून यात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून यामध्ये इतर अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन नियमाप्रमाणे उक्त जमिनींसंदर्भात संबंधित दुय्यम निबंधक यांनी दिलेल्या मूल्यांकनाप्रमाणे शासनास अगोदर ५०% व सद्यस्थितीत ७५% नजराणा रक्कम कोणीही भरलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री यांना दिनांक ६ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदरच्या जमिनीचे व्यवहार रद्द करून देवस्थान, दर्गा, मस्जिद तसेच इनामी जमिनी त्यांच्याच नावावरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) अशा आशयाच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

(२) (३) (४) व (५) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दि.६ जून, २०२१ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.३०.०७.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी करण्याबाबत कळविले आहे.

तसेच, बीड जिल्ह्यातील इनाम व वक्फ जमिनींच्या गैरव्यवहार प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या विविध तक्रारींची अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीमार्फत सखोल चौकशी करुन शासनास ३ महिन्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना दि.२३.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील बनावट बियाणांमुळे भुईमूग पिकांचे झालेले नुकसान

**(९) * ३५३३४ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील बनावट बियाणांमुळे ५ हजार हेक्टरवरील उन्हाळी भुईमूग पिकांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार यवतमाळ येथील नुकसानग्रस्त भुईमूग उत्पादन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासह बनावट बियाणे विकणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही

(२) यवतमाळ जिल्हयातील भुईमूग पिकाच्या तक्रारींच्या अनुषंगाने कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांचा समावेश असलेल्या समितीने क्षेत्रिय पाहणी केलेली आहे. उन्हाळी हंगामात भुईमुग पिकाच्या लागवडीमध्ये पिक फुलोरा अवस्थेत असतांना वातावरणातील अचानक झालेल्या बदलामुळे पिकांच्या वाढीमध्ये अनियमितता होऊन पिके पिवळी पडली आहेत. त्यामुळे आऱ्या व शेंगा लागण्याचे प्रमाण कमी होऊन भुईमूग पिकाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे असा निष्कर्ष समितीने दिला आहे. यासंदर्भात भुईमुग पिकाच्या उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रावर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(३) भुईमुग पिकाचे नुकसान हे वातावरणातील बदलामुळे झालेले असून बियाणांमध्ये कोणताही दोष आढळून आलेला नसल्याने बियाणे कंपन्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड-दापोली-मंडणगड (जि.रत्नागिरी) येथील पोलीस ठाणे इमारत तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वसाहतींच्या दुरावस्थेबाबत

**(१०) *३३२५० श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड-दापोली-मंडणगड (जि.रत्नागिरी) येथील पोलीस ठाणे इमारत तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वसाहतीची अत्यंत दुरावस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस ठाणे इमारतीचे तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाचे नुतनीकरण तातडीने करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त प्रकरणी गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३० जानेवारी, २०२१, ५ मार्च, २०२१ व १६ जून, २०२१ रोजी व पालक मंत्री, महाराष्ट्र राज्य, रत्नागिरी यांना दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवासस्थानाचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील खेड, दापोली, मंडणगड (जि.रत्नागिरी) येथील पोलीस ठाणे व प्रशासकीय इमारत बांधकाम तसेच पोलीस अधिकारी व अमंलदार यांच्याकरिता निवासस्थानांचा प्रस्ताव दिनांक १८/०६/२०२१ रोजी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर प्रकल्पास प्राधान्यक्रम व निधी देण्याची कार्यवाही निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे.

-----------------

## देवणी (जि.लातूर) तालुक्यामध्ये देवणी वळु संशोधन केंद्र उभारण्याबाबत

**(११) * ३४०१९ श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा विधानसभा मतदार संघामधील देवणी (जि.लातूर) तालुक्यातील प्रचलित वळु देशपातळीवर नावाजलेला असुन २६ पशु प्रदर्शनामध्ये देवणी वळुचे कौतुक होवून पारितोषिक ही मिळविलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलगंना या राज्यांमध्ये देवणी वळुला मोठी मागणी असल्यामुळे देवणी वळु संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत देवणी परिसरातील पशु पालकांनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने देवणी वळु संशोधन केंद्र उभारण्यास मान्यता देवून त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) देवणी जातीचे वळू देखणे व शेतीकामास उपयुक्त असल्याने, बऱ्याच पशु प्रदर्शनांमध्ये त्यांना पारितोषिक प्राप्त झालेले आहे.

(२) देवणी जातीच्या वळूंना राज्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा या राज्यांमध्ये मोठी मागणी असून, लातूर जिल्ह्यात देवणी या गाय वर्ग जातीचे जतन व संवर्धन करणेसाठी देवणी वळू संशोधन केंद्र स्थापन करण्याची लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(३) जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, लातूर यांचेकडून लातूर जिल्ह्यामध्ये देवणी गोवंश संवर्धन प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सुधारीत प्रकल्प प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही चालू आहे. सदरचा प्रकल्प प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यानंतर तो मंजूरीसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना कक्ष यांच्याकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अहमदपूर, चाकूर (जि.लातूर) या तालुक्यांमधील सोयाबीन पिकांचे झालेले नुकसान

**(१२) * ३३०३६ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर, चाकूर (जि.लातूर) हया तालुक्यांमध्ये पाऊस पडला नसल्यामुळे खरिप पिकांचे विशेषत: सोयाबीन पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून देण्यासाठी पंचनामे करण्याचे आदेश विमा कंपनीला देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुक्यातील नुकसान झालेल्या सोयाबीन पिकांचे पंचनामे करण्यांत आले आहेत काय,

(४) असल्यास, सदरहू तालुक्यांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना पिक विमा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत अहमदपूर व चाकूर तालुक्यातील सोयाबीन पिकाकरीता ५१५९३ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २२.२९४ कोटी निश्चित करुन वाटप करण्यात आले आहेत.

तसेच योजनेअंतर्गत स्थानिक नैसगिक आपत्ती या बाबी अंतर्गत सोयाबीन पिकाकरीता अहमदपूर तालुक्यातील २८८ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २०.२१ लाख व चाकूर तालुक्यातील १४६८ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ५७.१८ लाख निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिबवेवाडी (जि.पुणे) यश लॉन्स येथे १४ वर्षीय कबड्डीपट्टू मुलीची हत्या झाल्याबाबत

**(१३) * ३३९९२ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिबवेवाडी (जि.पुणे) यश लॉन्स येथे कबड्डीचा सराव करण्यासाठी गेलेल्या १४ वर्षीय कबड्डीपट्टू शाळकरी मुलीवर कोयता व चाकुने वार करुन तिची हत्या करण्यात आल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने आरोपींवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) पोलीस आयुक्त, पुणे शहर अंर्तगत बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे गु. र. नं.२०८/२०२१ भादवि ३०२, ५०६(२), १२०(ब), ३४ महा पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५, आर्म ॲक्ट ४(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील ३ आरोपींना मा. बाल न्यायमंडळासमोर हजर करुन न्यायालयीन अभिरक्षेत ठेवण्यात आले आहे व एक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्हयाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात धडक सिंचन विहीरीच्या कार्यक्रमांतर्गत विहीरींचे बांधकाम पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(१४) * ३५१५९ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर व वर्धा जिल्ह्यात धडक सिंचन विहीरीच्या कार्यक्रमांतर्गत दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये १३ हजार सिंचन विहीरींचा अतिरिक्त लक्षांक देऊन दिनांक ९ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस दिनांक ३० जून, २०२२ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतून गडचिरोली जिल्ह्यात सन २०१९-२० ते २०२०-२१ या कालावधीत सिंचन विहीरींचे बांधकाम पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना अद्यापही रु.४.३२ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंचन विहीरींचे बांधकाम पुर्ण केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच संबंधित अधिकारी यांना दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्याला १२ फेब्रुवारी, २०२० मध्ये रु. ३.७४ कोटी निधी प्राप्त झालेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत पूर्ण झालेल्या २० विहिरींसाठी रु.४५.२५ लक्ष तसेच प्रगतीपथावरील ४३६ विहिरींसाठी रु. ३६६.८७ लक्ष इतके अनुदान शेतक-यांना अदा करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत रु.४२५.३० लक्ष निधीची आवश्यकता आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) निधी उपलब्ध होताच वितरीत करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयामधील सदनिका आणि जमिनींच्या बनावट खरेदीखतांमध्ये झालेला गैरप्रकार

**(१५) * ३२७०२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेरा कायद्यांतर्गत नोंद नसलेल्या प्रकल्पांतील ४२४ सदनिकांची दस्त नोंदणी केल्याचे सन २०२०-२१ मध्ये निदर्शनास आले असुन शेतजमिनीच्या हस्तांतरणाचे दस्त नोंदविताना तुकडे पाडण्यास प्रतिबंध असतानाही १११ दस्त हवेली दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक- ३ मध्ये नोंदविण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी-विक्री करणारे पक्षकार हजर नसतानाही ते हजर असल्याचे दाखवून अन्य खासगी व्यक्तींद्वारे दस्त नोंदविण्यात आल्या प्रकरणी एका लिपिकाला निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवेली (जि.पुणे) तालुक्यामधील दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये करण्यात आलेल्या दस्त नोंदणीमध्ये बनावट दस्तांची नोंदणी होत असून व शेतजमिनीच्या हस्तांतरणाचे दस्त नोंदविताना तुकडे पाडण्यास प्रतिबंध असतानाही दस्तांची नोंदणी करण्यात येत असुन दिनांक २९ ऑक्टोबर ते १७ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत नोंदणी झालेल्या १,०३५ दस्तांच्या तपासणीमध्ये ६० दस्तांमध्ये अनियमितता आढळून आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, हवेली प्रांत कार्यालयात माहे फेब्रुवारी, २०१९ ते २०२१ या कालावधीत नोटीसा दिल्याशिवाय जमिनी प्रकरणे निकाली काढणे, अर्धन्यायिक प्रकरणांत अनियमितता, अपील चालविताना बेकायदेशीर निर्णय असे गैरप्रकार घडले असुन या कालावधीत पदावर असणारे प्रांताधिकारी यांच्या कार्यपद्धतीच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर विभागीय आयुक्तांच्या तपासणीत अनेक गैरप्रकार निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने हवेली (जि.पुणे) तालुक्यामधील दुय्यम निबंधक कार्यालयांमधील गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांवर व हवेली प्रातांधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

रेरा कायदयानुसार दस्त नोंदणीची कार्यवाही योग्यरित्या पार पाडली जाते किंवा कसे याबाबत शासनाव्दारे तपासणी पथकाचे गठन करण्यात आले आहे. दुय्यम निबंधक हवेली क्र. ३ या कार्यालयाच्या दि.०१/१२/२०२० रोजीच्या तपासणी अहवालातून सदर बाब निदर्शनास आली आहे.

सदर कार्यालयाचे तपासणीमध्ये पक्षकारांनी दस्त़ निष्पादित केलेले नसताना ते दस्त़ नोंदणीसाठी स्वीकारण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. सबब, प्रभारी सह दुय्य़म निबंधक हवेली क्र. ३ श्री ए. एम. गायकवाड वरिष्ठ लिपिक यांना नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या दि.०३/१२/२०२० च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे

(४) व (५) तत्कालिन उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी अर्धन्यायिक प्रकरणी पारित केलेल्या आदेशामध्ये अनेक गंभीर स्वरुपाच्या त्रुटी व अनियमितता निदर्शनास आल्याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि.२०.७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर अहवालाच्या आधारे शासकीय कामकाजात कर्तव्यपरायणता ठेवलेली नसून शासकीय कर्तव्ये व जबाबदारी तत्परतेने पार पाडली नसल्याने शासन आदेश दि.२५.८.२०२१ अन्वये तत्कालीन उपविभागीय अधिकारी,हवेली जि.पुणे यांची उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.६, सांगली या पदावर बदली करण्यात आली आहे.

तसेच हवेली तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयातील अनियमिततांचे प्रमाण जास्त असणाऱ्या ४ दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी विभागाने (एएनसी) डोंगरीतून १५ कोटी किंमतीचे हेरॉईन जप्त केल्याबाबत

**(१६) * ३२५०५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी विभागाने (एएनसी) डोंगरीतून १५ कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ (हेरॉईन) जप्त केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात राजस्थानमधील दोन जणांना अटक करण्यात आली असून मागील आठ महिन्यांत अंमली पदार्थ विरोधी पथकाने ड्रग्जची तस्करी करणाऱ्या विरोधात कारवाई करुन ३३३ गुन्हे नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, महसूल गुप्तचर संचालनालय, मुंबई विभागाच्या अधिकाऱ्यांनी (डिआरआय) मुंबईच्या जेएनपीटी परिसरातील एका कंटेनर यार्डवर छापा टाकून एका कंटेनर मधून १२५ कोटी रुपये किंमतीची २५ किलो हेरॉईनचा साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच राज्यातील युवापिढीला अंमली पदार्थाच्या विळख्यापासून वाचवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या आझाद मैदान युनिटकडून या प्रकरणात राजस्थानमधील दोन आरोपितांना व तामिळनाडूमधील एका आरोपितास अटक करण्यात आली आहे.

तसेच सन २०२१ मध्ये (ऑक्टोबर पर्यंत) अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडून ९६ गुन्हे दाखल करून एकूण १३९ आरोपितांना अटक करण्यात आले असून, २५९४ किलो, ९८९ ग्रॅम अंमली पदार्थ, १५८३० कोडेन बेस्ड कफ सिरपच्या बाटल्या, १८९ एल.एस.डी. पेपर्स असा एकूण ८९,२८,०४,२८५/- रूपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

(३) महसूल गुप्तचर संचालनालय ही संस्था केंद्र शासनाच्या वित्त विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेली संस्था आहे.

महसूल गुप्तचर संचालनालय, मुंबई झोनल युनिट यांनी दि.०५.१०.२०२१ रोजी उरण येथे कारवाई केली असून २५.४५ कि.ग्रॅ. वजनाचा अंदाजे रू.१.७५ कोटी किंमतीचा पांढऱ्या रंगाचा हेरॉईनसदृश्य अंमली पदार्थ जप्त केला आहे.

(४) मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाने डोंगरीतून रू.१५ कोटी किंमतीचे हेरॉईन जप्त करून ३ आरोपींना अटक केली असून त्यांच्याविरूध्द गु.र.क्र.८८/२०२१, एन.डी.पी.एस.कायदा, १९८५ मधील कलम ८(क), २१(क), २९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

२६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १० जुलै असा पंधरवडा साजरा करण्यात येतो. सदर पंधरवड्यादरम्यान अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत जनतेस तसेच विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग असे कार्यक्रम घेण्यात येतात. अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून युवापिढीने अंमली पदार्थाच्या सेवनापासून परावृत्त व्हावे म्हणून जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणेकरीता अंमली पदार्थांच्या सेवनाने होणारे दुष्परिणाम दर्शविणारे निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, भाषण स्पर्धा, पथनाटय इ. कार्यक्रम साजरे करुन विद्यार्थ्यामध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डिग्रस (ता.देऊळगाव, जि. बुलढाणा) येथील रेती घाटात ब्रास रेतीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(१७) * ३३४७१ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिग्रस ( ता.देऊळगाव, जि. बुलढाणा) येथील रेती घाटात दररोज शेकडो ब्रास रेतीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने डिग्रस येथील रेती घाटात अवैधरित्या ब्रास रेतीचे उत्खनन करणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावर दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यात माहे एप्रिल, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीमध्ये ७ प्रकरणांत रू.१४ लाख एवढी दंडात्मक कारवाई करून सदर दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच ५ वाहने जप्त केले असून २ प्रकरणांत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील करंजा बंदरात रो रो प्रकल्पाचे पाणी मिसळत असल्याबाबत

**(१८) *३३४९५ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील करंजा बंदरामध्ये रो रो प्रकल्पाचे पाणी मिसळले जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई येथील ससून डॉक बंदरावर मासळी उरतविताना होणारा ताण कमी करण्यासाठी करंजा बंदर उभारण्यात येत असून येथे एक हजार मच्छिमार बोटी लागण्याच्या क्षमतेचे अत्याधुनिक बंदर होणार असल्याने करंजा नवपाडा या तीन हजार लोकवस्तीच्या गावातील नाल्याचे पाणी देखील या बंदरात मिसळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे मासे विक्रेत्यांचे नुकसान होणार असून दुषित मासळी आंतरराष्ट्रीय बाजारात विकली जाणार असत्यामुळे बंदराला निर्यातीचा परवाना मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, करंजा बंदराचे काम ९ वर्षे इतका कालावधी उलटूनही अद्याप पूर्ण झालेले नसून उक्त बंदराच्या विकासाचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रो रो प्रकल्पाच्या सदोष व्यवस्थेमुळे दुषित सांडपाणी थेट नव्याने उभारण्यात येत असलेल्या करंजा बंदरात न येण्याबाबत व करंजा बंदराचे काम लवकर पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख** : (१) कारंजा-रेवस अशी रो रो सेवा सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून प्रथम अंतर्गत जलवाहतुक प्रकल्पांतर्गत करंजा येथील रो रो जेट्टीचे काम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत दि. ३१/३/२०१९ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. रो रो जेट्टीचे काम पुर्ण झालेले असले तरी वाहतुक सुरु झालेली नाही. त्यामुळे या प्रकल्पाचे पाणी मिसळण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) व (३) करंजा रस्त्याचे काम करण्यापुर्वी गावातील गटाराचे सांडपाणी हे मच्छिमार बंदराच्या चॅनलमध्ये येत होते. त्यामुळे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डमार्फत करण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कामामध्ये या सांडपाण्याचा मार्ग देखील बदलण्यात आलेला आहे. त्यामुळे या रो रो रस्त्याच्या कामामुळे ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही. तसेच गावातील येणारे गटाराचे सांडपाणी मच्छिमार बंदराच्या चॅनलमध्ये जाणार नाही या दृष्टीनेच सुधारीत आराखड्याप्रमाणे काम प्रगतीत आहे.

(४) बंदराचे काम प्रगतीपथावर असून ८० टक्क्यापेक्षा जास्त काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले आहे.

(५) बंदराचे काम प्रगतीपथावर असून ८० टक्क्यापेक्षा जास्त काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले असून गावातील येणारे गटाराचे सांडपाणी मच्छिमार बंदराच्या चॅनलमध्ये जाणार नाही या दृष्टीनेच सुधारीत आराखड्याप्रमाणे काम प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी व आरे येथील बृहन्मुंबई दूध योजनेतंर्गत सुरु केलेल्या दुग्ध शाळांची दुरावस्था झाल्याबाबत

**(१९) * ३२५९५ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी आणि आरे येथे बृहन्मुंबई दूध योजनेतंर्गत शासनाने सुरु केलेल्या दुग्ध शाळांची दुरावस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुग्ध शाळांमधील पॅकिंग, शीतकरण तसेच विद्युत यंत्रणा जुनाट झाल्याने वारंवार बिघाड होत असून दूध वितरणासाठी वापरले जाणारे प्लॅस्टिकचे ट्रे तुटलेले असल्याने दुधाच्या पिशव्या फुटण्याचे प्रकार घडत असल्यामुळे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुग्ध शाळांच्या झालेल्या दुरावस्थेमुळे दुग्ध शाळांचे आणि इतर यंत्रणांचे आधुनिकीकरण करण्याची मागणी महाराष्ट्र दूध वितरण संघाने केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) राज्यात दुग्ध व्यवसायात सहकारी व खाजगी व्यवसायीकांचा वाढता सहभाग विचारात घेता यातून टप्पा - टप्प्याने बाहेर पडण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे दुग्धशाळेचे किंवा यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यासाठी खर्च करणे निधीचा अपव्यय ठरेल.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या संगनमताने अवैध गैरप्रकार होत असल्याबाबत

**(२०) * ३५५२८ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या संगनमताने अवैध वाळू वाहतूक, दारु, ताडी, मटका, गुटखा, जुगार इ. अवैध प्रकार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वाळू चोरांकडून पोलिस शिपाई यांची कर्तव्य बजावताना अंगावर गाडी घालून दिनांक ५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निर्घृण हत्या करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्याकरिता पोलीस उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांचा पदभार काढून सक्षम अधिकाऱ्यांकडून चौकशी होण्याबाबत गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) मंगळवेढा तालुक्यातील उप विभागीय पोलीस अधिकारी यांच्या संगनमताने अवैध वाळू वाहतूक, दारु, ताडी, मटका, गुटखा, जुगार इ. अवैध प्रकार सुरु असल्याची बाब खरी नाही. तथापि, याबाबत मंगळवेढा पोलीस उप विभाग अंतर्गत माहे ऑक्टोबर २०२१ पर्यंत अवैध वाळू वाहतूकीसंदर्भात १४५ केसेस, दारुबंदीबाबत ३६८ केसेस, अवैध जुगारासंदर्भात ९७ केसेस, गुटखा संदर्भात १४ केसेस, अंमली पदार्थ संदर्भात ०३ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

वाळू चोरांकडून पोलिस शिपाई यांची कर्तव्य बजावताना अंगावर गाडी घालून निर्घृण हत्या करण्यात आली असल्याची घटना दिनांक २५ सप्टेंबर २०२१ रोजी घडली आहे.

या प्रकरणी मंगळवेढा पोलीस ठाणे गु.र.क्र. भाग १ ते ५ गु.र.क्र. ६३०/२०२१ भा.दं.वि. कलम ३०२, ३३३, ३५३, ३७९, २७९, ३४ पर्यावरण संरक्षण कायदा कलम ९ व १५, मो. वा. का. क. १८४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) होय,

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन पोलीस अधीक्षक कार्यालयास

प्राप्त झाले आहे.

(४) दाखल गुन्ह्यामध्ये ४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी एक अल्पवयीन असून त्याची रवानगी बाल सुधारगृहात करण्यात आली होती. तथापि, त्याला बाल न्याय मंडळ, सोलापूर यांनी जामीन मंजूर केला आहे. प्रकरणी अधिकचा तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम तातडीने देण्याबाबत

**(२१) * ३२४६० श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षासाठी पिक विमा योजनेतंर्गत विम्याच्या हफ्त्यापोटी सुमारे ४,७८७ कोटी रुपये विमा कंपन्यांना दिलेले असताना विमा कंपन्यांनी दाव्यापोटी फक्त ३,०९४ कोटी रुपये शेतकऱ्यांना दिल्यामुळे विमा कंपन्यांना कोट्यवधी रुपयांचा नफा झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीमध्ये झालेली अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अपरिमित नुकसान झाले असून शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अद्यापही मिळालेली नसून राज्य सरकारने त्यांच्या वाट्याची हफ्त्याची रक्कम न भरल्यामुळे सदर रक्कम मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आंबा उत्पादकांचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान अचानक पडलेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने तीन वर्षाकरिता निश्चित केलेल्या पीक विमा योजनेतील निकषात बदल न केल्यामुळे रत्नागिरी जिल्हयातील सुमारे २१ हजार ३५१ आंबा व काजू उत्पादक शेतक-यांना पिक विमा योजनेच्या परताव्याची रक्कम मिळण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, शासन निर्णयानुसार सलग ६ दिवसांत एकूण १५० मिलीमीटर व त्यापेक्षा जास्त पाऊस पडल्यास अतिवृष्टी समजण्यात येते, परंतु ३,४,५ दिवसांत जरी १५० मिलीमीटर किंवा त्याहून अधिक पाऊस पडला तरीही अतिवृष्टी समजली जात नसल्याच्या शासकीय निकषामुळे जत (जि.सांगली) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकरी तसेच राज्यातील सर्वच नुकसानग्रस्त शेतकरी पीक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यास पात्र होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पिक विमा योजनेत असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी सुधारणा सुचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, उपसमितीने कोणत्या शिफारशी सादर केल्या आहेत, तसेच विमा संरक्षित रक्कम देतांना निकषात बदल न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम तातडीने मिळण्याबाबत व विम्याची रक्कम देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही,

सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षांसाठी पिक विमा योजनेतंर्गत विम्याच्या हफ्त्यापोटी विमा कंपन्यांना रु. ९८४३.५५ कोटी वितरीत करण्यात आले होते. तर सहभागी विमा कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांना रक्कम रु. १०२०५.२९ कोटी इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही,

आंबा व काजू हे फळपिक आंबिया बहाराकरिता अधिसूचित असून कृषि विद्यापिठातील शास्त्रज्ञ तसेच राष्ट्रीय फळ संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ, विविध फळ उत्पादक / बागायतदार संघाचे शेतकरी प्रतिनिधीं यांनी पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेअंतर्गत अधिसुचित असलेल्या फळपिकांसाठी

हवामान विभाग निहाय, जिल्हानिहाय व्यवहारीक हवामान धोके निश्चित केले. त्यानुसार आंबिया बहार सन २०२०-२१ करिता आंबा या फळपिकाचा विमा संरक्षण कालावधी दि. १ डिसेंबर २०२० ते ३१ मे २०२१ व काजू या फळपिकाचा विमा संरक्षण कालावधी दि. ०१ डिसेंबर ते ३० एप्रिल २०२१ असा निश्चित करण्यात आला असल्याने माहे ऑगस्ट २०२१ या कालावधीकरिता विमा संरक्षण लागू होत नाही.

(४) हे खरे नाही,

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खरीप हंगाम २०२१ मध्ये जत तालुक्यातील १६५४९ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रु. ५१.६२ लाख विमा हप्ता भरुन ०.११५ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले होते. योजनेअंतर्गत नुकसान झाल्याबाबत एकूण २९३ पूर्वसूचना प्राप्त झाल्या. प्राप्त पूर्वसूचनांपैकी २२५ पूर्वसूचना नुकसान भरपाईस पात्र ठरल्या असून त्यापैकी दि. १०.१२.२०२१ अखेर स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण १५२ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ६.२५ लाख वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

खरीप हंगाम २०२१ मध्ये राज्यामधील शेतकऱ्यांनी ८४.०१ लाख अर्जव्दारे पीक विमा योजनेत सहभाग नोंदविला असुन दि.१०.१२.२०२१ अखेर स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत एकूण ३६.३० लाख शेतक-यांना रु. २३१९.२५ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली असून त्यापैकी १९.६६ लाख शेतकऱ्यांना रु. १३५०.६४ कोटीचे वाटप विमा कंपनी मार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) दि. १४.०१.२०२१ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीमध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात बीड मॉडेल (Cup & Cap Model) लागू करण्याकरीता केंद्र शासनाच्या मंजूरीस प्रस्ताव पाठविणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने सदर मॉडेल राज्यात राबविण्याकरीता केंद्र शासनास दि. २०.०१.२०२१ रोजी सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेसंदर्भात मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक २ जून २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये योजना मृग व आंबिया बहार सन २०२१-२२ ते २०२३-२४

या कालावधीमध्ये सुधारित हवामान धोक्यानुसार राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १८ जून २०२१ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

(६) प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत खरीप २०२१ मध्ये योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती व हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत दि. १०.१२.२०२१ अखेर ३७.१७ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २१२८.७९ कोटी निश्चित करण्यात आली असून २५.९२ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. १३४७.७९ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेतंर्गत मृग बहार सन २०२१ मध्ये १.२८ लाख शेतकऱ्यांनी ९५,६४९.९२ हे. क्षेत्राकरिता विमा संरक्षण घेतले आहे. पैकी ६६,३७१ शेतकऱ्यांना ८३.९६ कोटी नुकसान भरपाई देय होत आहे. काही फळपिकांचा विमा संरक्षण कालावधी सुरु असल्याने विमा परिगणना प्रलंबित आहे.

-----------------

## मौजे पाली (जि. ठाणे) येथील खाजगी तसेच सरकारी जमिनी औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात आल्याबाबत

**(२२) * ३५०६०    श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाली (जि. ठाणे) येथील १०५.५७९ हे.आर.एवढे खाजगी क्षेत्र व १.२० हे.आर. एवढे सरकारी क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात येत असल्यामुळे त्यास विरोध करण्याबाबत गाव बचाव संघर्ष समिती, पाली यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान विनंती अर्ज दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गाव बचाव संघर्ष समिती, पाली यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पुर्नवसन व पुर्नबहाली धोरण, प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती संघर्ष समितीस अवगत करून भूधारकांच्या संमतीने भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यात अवैध गैरव्यवहार सुरु असल्याबाबत

**(२३) * ३४९५६ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात अवैध दारुची दुकाने, जुगार तसेच बार सुरु असल्यामुळे सदर प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी संबंधितांना माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पोलीस अधिक्षक यांनी आदेश देऊनही वसमत शहरात रस्त्यावर दारु विक्री सुरु असून बारमध्ये जुगार सुरु असल्याचे माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) जिल्हा पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे अवैध धंद्यांवर कारवाई करण्याबाबतचे नियमित आदेश आहेत. त्यानुसार

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर माहे ऑक्टोबर २०२१ पर्यंत दारुबंदीच्या (८४४), अवैध जुगारासंदर्भात (३३६), जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत (०७), अवैध वाळू (४५) व गुटखाबाबत (४०) इतक्या गुन्ह्यांमध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) व (३) बसमत शहर व परीसरात अवैध दारु विक्री व बारमध्ये जुगार व्यवसाय चालु असल्याची बाब निदर्शनास आल्यास कारवाई करण्यात येत असून स्थानिक गुन्हे शाखा व स्थानिक पोलीस स्टेशन यांच्याकडून माहे जानेवारी २०२१ ते ऑक्टोबर २०२१ पर्यंत दारुबंदीच्या १६३ व अवैध जुगारासंदर्भात ४२ केसेस करण्यात आल्या आहेत.

स्थानिक गुन्हे शाखा, हिंगोली यांना अवैध धंद्यांबाबत विशेष मोहिम राबवून कारवाई करण्याबाबतच्या सूचना पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्याकडून देण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यात कृषी विभागाने निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाणांचे वाटप करून शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(२४) * ३३५७२ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यात कृषी विभागाने निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाणांचे वाटप करून फसवणूक केल्याची तक्रार शेतक-यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणांचे वाटप करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील (नरेगा) काम करणाऱ्या मजुरांना मजुरी मिळण्याबाबत

**(२५) * ३३८१७ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) राज्यात विविध कामांवर काम करणाऱ्या मजुरांना मागील सहा आठवड्यांची सुमारे ६१ कोटी रुपयांची मजुरी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने तसेच काही जिल्ह्यांनी लेखापरिक्षण अहवाल (ऑडीट) न केल्याने मजुरांची मजुरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) व (२) हे खरे आहे.
संपूर्ण राज्याचा एकत्रित ऑडिट रिपोर्ट दि.८/११/२०२१ रोजी सादर करण्यात आला असता केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे. दि.८/१२/२०२१ पर्यंतची अकुशल मजूरी पूर्णपणे अदा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) येथे गोवंशासह लाखांचा माल जप्त केल्याबाबत

**(२६) * ३५०४४ श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर (ता.निफाड, जि.नाशिक) येथे गोवंशासह दहा लाखांचा मुद्देमाल माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान जप्त करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी एका ठिकाणी १९ गोवंश व इतर ठिकाणी १३० गायी व वासरे यांची तोंडे बांधून ठेवल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे मुक्या जनावरांच्या जीवाशी खेळणाऱ्या संबंधित गुन्हेगारांवर व गोवंशाबरोबरचा होत असलेला काळाबाजार बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) ओझर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन ठिकाणी छापे मारुन रु. १०,०३,५००/- चा मुद्देमाल जप्त करुन आरोपींविरुद्ध गु.र.क्र. १४६/२१ व १४७/२१ अंतर्गत महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ सुधारणा, २०१५ व भारतीय प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध कायदा, १९६० अन्वये दि. १९/७/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुक्या जनावरांच्या जीवाशी खेळणाऱ्या संबंधित गुन्हेगारांवर व गोवंशाबरोबरचा होत असलेला काळाबाजार बंद करण्याबाबत महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ सुधारणा, २०१५ अन्वये प्राण्यांच्या वाहतूक व हत्या करण्यास कायदेशीर प्रतिबंध करण्यात आला आहे. जनावरे वाहतूक व अवैध होत असलेल्या प्राणी हत्यांबाबत संबंधितांवर सदर कायद्यातील कलमांन्वये कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. घटक प्रमुखांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील वन्यजीव प्राणी कल्याण समितीच्या व्यक्तींशी संपर्क साधून अवैध

प्राण्यांची वाहतूक रोखण्यासाठी उचित सहकार्य करुन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडल्याबाबत

**(२७) * ३५१४९ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सुमारे १ लाख ९० हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी त्यांच्या घरातून एक कोटी रुपयांपेक्षा जास्त रोकड, जवळपास दीड कोटी रुपयांची मालमत्ता, कागदपत्रे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने हस्तगत केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपायुक्तांवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) पुणे येथील उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १ लाख ९० हजारांची लाच घेताना दि. १६ ऑक्टोबर,२०२१ रोजी अटक केली आहे.
(२) सदरचे लोकसेवक यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामार्फत दाखल गुन्हयाचे अनुषंगाने पंचसमक्ष घरझडती घेण्यात आली. घरझडती दरम्यान २,८१,८९,०००/- रुपयांची मालमत्ता आढळून आली असून त्यापैकी १,२८,४९,०००/- रुपये रोख रक्कम आढळून आली आहे.
(३) सदरचे लोकसेवक यांचेविरुध्द वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. ३६६/२०२१, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम- ७ अन्वये गुन्हा

दाखल करण्यात आला असून, त्यांना दिनांक १६.१०.२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोवंडी व शिवाजीनगर परिसरातून पाच बोगस डॉक्टरांना अटक केल्याबाबत

**(२८) * ३३०८४ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी व शिवाजीनगर परिसरातून पाच बोगस डॉक्टरांना मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट सहाच्या पथकाने दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीसांनी उक्त संबंधितांवर कारवाई केली आहे काय, कारवाईत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३)

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग कक्ष-६, चेंबूर, मुंबई या कार्यालयाकडून दिनांक १८/०८/२०२१ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका, एम वार्ड पूर्व येथील वैद्‌यकीय अधिकारी डॉ. प्रिया कोळी यांच्या नेतृत्वाखाली एकूण पाच डॉक्टरांचे वैद्‌यकीय पथक यांची मदत घेऊन शिवाजी नगर गोवंडी परिसरात एकाच वेळी पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापा टाकला असता १) श्री.कासिम अकील खान, २) मेहताब अहमद अनुरूल हसन, ३) मो. याकुब घुरी इद्रीसी, ४) मोहम्मदशफी रहिमतुल्ला आलम, ५) नगेंद्र प्रकाश मिश्रा असे एकूण पाच बोगस डॉक्टरांकडे कोणताही अधिकृत वैद्‌यकीय परवाना नसताना तसेच महाराष्ट्र

मेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणी नसताना डॉक्टर असल्याचे भासवून बेकायदेशीररित्या विविध आजारावरील रुग्णांना औषधे व इंजेक्शन देऊन औषधोपचार करताना मिळून आले. या बोगस डॉक्टरांना पंचनामा करून ताब्यात घेतले व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे करिता संबंधित कागदपत्रांसह शिवाजीनगर पोलीस ठाणे यांना हस्तांतर करण्यात आले.

शिवाजीनगर पोलीस ठाणेकडून पाच जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाणे करीत आहे .

एकूण पाच बोगस डॉक्टर यांच्याविरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका पूर्व येथील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय अधिकारी यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाणे कडून भा.दं.वि. कलम ४१९, ४२० भा.दं.वि. सह कलम ३३, ३६ महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स अॅक्ट १९६१ अन्वये कायदेशीर कारवाई करून त्यांच्या विरुद्ध गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी गोशाळांना आर्थिक अनुदान देणारी गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना सुरु करण्याबाबत

**(२९) * ३३३८२ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी गोशाळांना आर्थिक अनुदान देण्यात येणारी गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्यामुळे मागील दोन वर्षापासून सदर योजना बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारीत योजनेची अंमलबजावणी होत नसल्याने अनुत्पादक गोवंशीय प्राण्यांचा सांभाळ करणे, त्यांचा चारा, पाणी, निवाऱ्याची सोय करणे, वैरण उत्पादन कार्यक्रम राबविणे, गोमुत्र, शेण आदीपासून विविध उत्पादने, खते गोबर गॅस व इतर उत्पादनांना चालना देणे, देशी गायीच्या संवर्धनांकरिता कृत्रिम रेतन करुन घेणे इत्यादी योजना प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेतंर्गत बैल व वळू यांची कत्तल न करता त्यांचा सांभाळ करणाऱ्या सुमारे ५६५ गोशाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १३९ महसूली भागांमध्ये माहे मार्च, २०१९ पासून सुधारित स्वरुपात सदर योजना लागू करतांना प्रत्येक गोशाळांना रुपये २५ लाख प्रमाणे ३ कोटी ७५ लाख रुपये इतके अनुदान तत्कालीन शासनाने मंजूर केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दोन वर्षापसून बंद असलेल्या सदर योजनेस निधी उपलब्ध करुन योजना अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार** : (१) गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या ३४ संस्थापैकी २ संस्थांनी अनुदान नाकारल्यामुळे उर्वरित ३२ संस्थाना एकूण रू.२१.९३ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) असे निदर्शनास आले नाही.

दिनांक ८.३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील १३९ महसूली उपविभागांमध्ये “सुधारीत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र” योजना राबविण्याचा निर्णय घेतला.

तथापि, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्याच्या आर्थिक संसाधनावर पडलेल्या प्रभावामुळे आर्थिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षामध्ये निधी उपलब्धतेवर मर्यादा आल्याने योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरीवली (मुंबई उपनगर) विभागातील चारकोप व गोराई येथील शासकीय भूखंडावर अतिक्रमण होत असल्याबाबत

**(३०) * ३४३५५ श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई उपनगर) विभागातील चारकोप व गोराई येथील बस डेपोच्या मागे शासकीय भूखंडावर मोठ्या प्रमाणात गुरांचे गोठे, झोपड्या तसेच अनधिकृत व्यावसायिक यांचेकडून गाळे बांधून अतिक्रमणाने जागा घेवुन गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले अनेक असामाजिक घटक येथे वास्तव्य करून अंमली पदार्थांचे सेवन व विक्रीचे अड्डे तयार करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरीवली विभागातील चारकोप व गोराई येथील शासकीय भूखंडावर अतिक्रमण होत असल्याबाबत उचित कारवाई करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक २७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना ई-मेलद्वारे निवेदन देऊन मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने बोरीवली विभागातील चारकोप व गोराई येथील शासकीय भूखंडावर झालेल्या अतिक्रमणावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) चारकोप व गोराई येथील बस डेपोच्या मागे शासकीय भूखंडावर गुरांचे गोठे, झोपड्या व गाळे बांधून अतिक्रमण झाल्याचे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मौजे-चारकोप, ता.बोरीवली येथील स.नं.३९, लक्ष्मीनगर येथील शासकीय मिळकतीवर अंदाजे २०० कच्ची/पक्की अनधिकृत बांधकामे माहे एप्रिल, २०२१ मध्ये निष्कासित करण्यात आली आहेत.

तसेच मौजे-बोरीवली, ता.बोरीवली येथील न.भू.क्र. ८८५, ८८६ (गोराई बस डेपोच्या मागे) या शासकीय मिळकतीवरील एकूण १६ अनधिकृत बांधकामे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये निष्कासित करण्यात आली आहेत.

-----------------

## राज्यात महिलांविरोधी गुन्ह्यांशी संबंधित खटले प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * ३४०३८ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एनसीआरबीने (नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरो) प्रकाशित केलेल्या अहवालानूसार सन २०१९ या कालावधीत राज्यात महिलांविरोधी गुन्ह्यांशी संबंधित २ लाख ७ हजार (९४ टक्के) खटले प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेनऊ हजार खटल्यांमधील आरोपी पुराव्यांविना निर्दोष सुटले असून राज्यातील दोषसिध्दीदर खूपच कमी म्हणजे १३.७ टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या अहवालानुसार मुंबईत माहे जानेवारी, २०२१ ते जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान बलात्काराचे ५५० गुन्हे, विनयभंगाचे सुमारे ११०० गुन्हे व हुंडाबळीचे ८ गुन्हे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातून गेल्यावर्षी ६३,२५२ बेपत्ता महिलापैकी २३ हजार महिला अद्याप सापडल्या नसल्याची माहिती निदर्शनास आली असून यामध्ये १५०० अल्पवयीन मुलींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कायद्यातील विविध त्रुटी, पुरावे गोळा करण्यास होणाऱ्या विलंबामुळे दोषसिध्दीसाठी विलंब होत असल्याने परिणामी गुन्हेगार निर्दोष मुक्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरो अहवाल-२०२० नुसार सन २०१९ पर्यंतचे २०७२०३ गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

(२) सन २०२० मध्ये नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरोने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार ३६५५ खटल्यांमधील आरोपी निर्दोष सुटले आहेत. यामध्ये राज्याचा दोषसिध्दीचा दर १५.३ आहे.

(३) होय.

(४) सन २०२० मध्ये नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरोने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार सन २०२० अखेरपर्यंत राज्यातील ६३,२५२ बेपत्ता महिलांपैकी ४०,०९५ महिला सापडल्या आहेत. तसेच सन २०२० अखेरपर्यंत राज्यातील ४,५१७ बेपत्ता अल्पवयीन मुलीपैंकी ३,०९५ अल्पवयीन मुली सापडल्या आहेत.

(५) फिर्यादी/बळीत फितुर होणे, साक्षीदार फितुर होणे, संमतीच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण कमी असणे, फिर्यादीकडून गुन्हा विलंबाने दाखल होणे इ., कारणांमुळे अनेक प्रकरणात गुन्हेगार निर्दोष मुक्त होतात.

(६) फौजदारी कायदे (सन २०१८ ची दुसरी सुधारणा) अन्वये बलात्कारांच्या गुन्ह्यांमध्ये शिक्षेत वाढ करण्यात आली आहे, तसेच अशा गुन्ह्यांचा तपास २ महिन्यांच्या आत करणे हे चौकशी अधिकाऱ्यांवर बंधनकारक करण्यात आले आहे. अटकपूर्व जामिनाची तरतुद काही गुन्ह्यात नसल्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक ०९.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व पोलीस घटकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपींना शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलीत कायद्यात सुधारणा करून शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१८ पारित केला आहे.

अल्पवयीन पिडीत मुली व महिलांविरूध्दच्या गुन्ह्याचा तपास विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आयुक्तालय स्तरावर संबंधित पोलीस उप आयुक्त यांनी तर जिल्हा स्तरावर संबंधित पोलीस अधिक्षक यांनी वेळोवेळी आढावा

घेण्याबाबत शासनाच्या दिनांक ०९.०७.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

हुंडा पध्दत नष्ट करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ०२.११.२०११ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रत्येक जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २० सदस्यांची "महिला जिल्हा सल्लागार समिती" गठीत करण्यात आली आहे.

महिला व बालकांवरील लैंगिक अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याबाबतच्या उपाययोजना करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दिनांक ०२.०८.२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे.

भारतीय दंड सहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे अधिनियम महाराष्ट्र राज्यात लागू असताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता सन २०२० चे विधानसभा विधेयक क्र. ५१ शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक हे दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले असून, येत्या हिवाळी अधिवेशनामध्ये संयुक्त समितीचा अहवाल विधानमंडळ सभागृहासमोर सादर करण्यात येणार आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांची संख्या वाढविण्याबाबत

**(३२) * ३५५८८ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण)** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ६० कारागृहांतील अधिकृत बंदीक्षमता २४,०३२ असून प्रत्यक्षात ३२,९९७ कैदी असून त्यापैकी मुंबई, येरवडा, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नाशिक रोड, कोल्हापूर आणि तळोजा येथे बंदीक्षमता १४,४९१ असताना प्रत्यक्षात २३,८५८ कैदी असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात मुख्यत्व सोलापूर जिल्ह्यात कारागृहापेक्षा कैद्यांची संख्या जास्त असल्याने कारागृहातील उपलब्ध जागेवर दुसरे कारागृह बांधण्याबाबत तसेच जिल्हा व खुला कारागृहांमध्ये अतिरिक्त तसेच नवीन बॅरेक्स बांधण्याबाबत शासनाने उपाययोजना केली आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कारागृहांच्या क्षमतावाढीबाबत अथवा नवीन कारागृहे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :**(१) सप्टेंबर २०२१ अखेर, राज्यातील ६० कारागृहांतील अधिकृत बंदीक्षमता २४७२२ इतकी असून सद्य:स्थितीत एकूण ३५,५६५ बंदी बंदीस्त आहेत. तर मुंबई, येरवडा, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नाशिक रोड आणि तळोजा या ९ मध्यवर्ती कारागृहांची अधिकृत बंदीक्षमता सप्टेंबर, २०२१ अखेर १५,५०६ इतकी असून, सद्य:स्थितीत २५,१६५ बंदी बंदीस्त आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा कारागृहातील उपलब्ध जागेवर दुसरे कारागृह बांधण्याचे प्रस्तावित नाही.

तथापि, येरवडा व विसापूर खुले कारागृह तसेच चंद्रपूर, यवतमाळ, अहमदनगर, नागपूर, बुलढाणा, व सातारा जिल्हा कारागृहातील अतिरिक्त नवीन बॅरक्सची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) गोंदिया, अहमदनगर, येरवडा, मुंबई, हिंगोली, भुसावळ, अलिबाग व नांदेड याठिकाणी नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील आत्मा प्रकल्प संचालक यांनी शेतक-यांना निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा पूरवठा करून केलेला आर्थिक गैरव्यवहार

**(३३) * ३४३२५ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील आत्मा प्रकल्प संचालक यांनी शेतक-यांना निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा पूरवठा करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर साहित्य वितरणात डीबीटी प्रक्रिया राबविण्याचे स्पष्ट निर्देश असताना आत्मा प्रकल्प संचालक यांनी खनिज विकास निधी अंतर्गत चार कोटी रुपयांमधुन साहित्य खरेदी करून त्यांचे वितरण केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपन्यांकडून संचालक यांनी साहित्यांची खरेदी केली त्यामध्ये सुदेव सीड्स मार्केटिंग, कृषी संजीवनी व यापूर्वी कार्यरत असलेल्या भंडारा येथील कंपन्या जरी वेगवेगळया असल्या तरी श्रीदेवी रतन कॉम्प्लेक्सचा पत्ता सारखाच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने साहित्य पुरवठयात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित संचालक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) या प्रकरणी प्राथमिक चौकशी केली असून पुढिल कार्यवाही आयुक्त (कृषी) यांच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

## सोनपेठ (जि.परभणी) तालुक्यातील अल्पवयीन तरुणीवर झालेला बलात्कार

**(३४) * ३२६९९ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनपेठ (जि.परभणी) तालुक्यामधील महाविद्यालयात शिकणाऱ्या अल्पवयीन तरुणीवर तीन जणांनी बलात्कार केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर पिडित मुलीने विष प्राशन करून आत्महत्या केली असून याप्रकरणी नातेवाईकांच्या तक्रारीनंतर दिनांक १९ सप्टेंबर, २०२१ रोजी पोलिसांनी भादंवि कलम ३७६(ड), ३५४(ड) ३४ सह कलम ३, ६, ८, १७ सह पोस्कोअंतर्गत आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला तसेच या बलात्कार प्रकरणातील एक आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) व (३) पिडीत अल्पवयीन मुलीने विषारी औषध प्राशन केल्याने तिचा मृत्यू झाला आहे. याबाबत दिनांक २०.०९.२०२१ रोजी सोनपेठ पोलीस ठाणे येथे भा. द. वि., कलम ३७६ ड, ३५४ ड, ३०६, ३४ सह पोक्सो अधिनियमाचे कलम ४, ६, ८, १७ अन्वये ३ आरोपींविरुध्द गु. र. नं., २२१/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरील ३ आरोपींपैकी आरोपी क्र. ३, वय २८ वर्षे, रा. डिघोळ, ता. सोनपेठ यास दिनांक २१.०९.२०२१ रोजी अटक करण्यात आली असून सदर आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. उर्वरित २ ही आरोपी हे विधीसंघर्षीत बालक असून त्यांना ताब्यात घेऊन अध्यक्ष, बाल न्याय मंडळ, परभणी यांच्या समक्ष हजर केले असता दोघांना बालसुधारगृह, परभणी येथे पाठविण्यात आले आहे. सदर गुन्ह्यात तपास पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गासाठी बांदा (जि.सिंधुदुर्ग) सीमा तपासणी नाक्यासाठी जमिन संपादीत करताना शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(३५) * ३३२७६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गासाठी बांदा (जि.सिंधुदुर्ग) सीमा तपासणी नाक्यासाठी जमिन संपादनासाठी तसेच जमिनीत असणाऱ्या खनिजाची भरपाई म्हणून

एकूण ११९ शेतक-यांना सुमारे १२५ कोटी रुपये द्यावयाचे असताना केवळ ४ कोटी रुपये देऊन संबंधित शेतक-यांची फसवणूक केल्याचे शेतक-यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले असून ते अनेक वर्षांपासून याबाबत पाठपुरावा करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण आयुक्त यांनी प्रक्रियेतील अनेक दोष, त्रुटी, कायद्याचे पालन न करणे, सुप्रीम कोर्टाचे आदेश न पाळणे अशा प्रकारचा गैरप्रकार करुन सुमारे २१५ कोटी रुपये किंमतीच्या लोह खनिजाची चोरी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची मदत करुन कर्तव्यात कसूर केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनीत लोह खनिजाचे मुबलक साठे असल्याने ही जमिन सीमा तपासणी नाक्यासाठी घेवू नये असे भूविज्ञान अधिकारी यांनी प्रथम अहवालात सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कारवाई करून शेतक-यांना भूसंपादनाचा उर्वरित १२१ कोटी रुपयांचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) संचालक भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय नागपूर यांनी दि.२३.०९.२०१० अन्वये ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आधारवाडी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील कारागृहातील कैद्यांनी शिपायांवर हत्यारांनी केलेला हल्ला

**(३६) * ३३५९७ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आधारवाडी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील कारागृहातील कैद्यांच्या बराक्यांची तपासणीसाठी गेलेल्या जेलरसह त्यांच्या मदतीसाठी धावलेल्या शिपायांवर दोघा कैद्यांनी मिळून धारदार हत्यारांनी वार केल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोपींविरुध्द पोलीसांनी कोणता गुन्हा दाखल केला आहे व त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) आणि (३) घटनेशी संबंधित दोन्ही बंद्याविरुध्द खडकपाडा पोलीस स्टेशन, कल्याण येथे गु.र.क्र.२८१/२१ भादंवि कलम ३५३,३३२,३३३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोन्ही बंद्यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांना दिनांक १०.०९.२०२१ रोजी कल्याण जिल्हा कारागृहातून तळोजा मध्यवर्ती कारागृह, नवी मुंबई येथे वर्ग करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(३७) *३३६०१ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात सन २०२१ मध्ये खरीप हंगामात पावसाचा खंड पडल्यामुळे ५०% पेक्षा जास्त नुकसान झाल्याने २५ % अग्रीम नुकसान भरपाई मिळण्याबाबत जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी अधिसूचना वितरित केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरुवातीस पीक नुकसानीच्या अहवालावर सही करण्यास नकार देणाऱ्या पीक विमा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कृषी विभागाचा नुकसानीबाबतचा अहवाल ग्राहय धरुन दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास मान्य केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पीक विमा कंपनीने सुरुवातीस पिकांचे नुकसान ५०% च्या आत आहे असे अकुशल कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून तयार केलेला अहवाल सादर केला असता विमा प्रतिनिधी कृषी क्षेत्रातले तज्ञ नाहीत हे लक्षात आणून दिल्यानंतर विमा कंपनीच्या वरिष्ठांनी नुकसानीबाबत आपले म्हणणे बाजूला ठेवत कृषी विभागानुसार ५०% पेक्षा जास्त नुकसान झाले आहे हे मान्य केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या व शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच कंपनी यांचेविरुध्द कारवाई करुन सदर अग्रीम रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२१ मध्ये उस्मानाबाद जिल्हयातील ६.६९ लाख शेतकरी अर्जदारांनी रक्कम रु. ३६.७२ कोटी विमा हप्ता भरुन ४.४८ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. योजनेअंतर्गत दिनांक १०.१२.२०२१ अखेर स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण २.६८ लाख शेतक-यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ३७० कोटी व हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण ०.७५ लाख शेतक-यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ३६.९९ कोटी असे एकूण ३.४२ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ४०६.९९ कोटी विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी ३.१४ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु.३६५.८० कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील फॉरेन्सिक लॅबमध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचार (पोक्सो) व महिलांवरील गुन्हयासंबंधीच्या डीएनएचे शेकडो नमुने चाचणीविना प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * ३२६५८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फॉरेन्सिक लॅबमध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचार (पोक्सो) व महिलांवरील गुन्हयासंबंधीच्या डीएनएचे शेकडो नमुने चाचणीविना प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तंत्रज्ञानाच्या कमतरतेमुळे पोक्सो संबंधी ११०६ तर मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे महिलांवरील बलात्काराच्या गुन्हयांतील १०७५ डीएनएचे नमुने असे दोन्ही प्रकरणातील २१८१ नमुने चाचणीविना प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वाढत्या गुन्हयांची प्रकरणे लक्षात घेता, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर नमुन्यांची त्वरित चाचणी करण्याबाबत व राज्यातील फॉरेन्सिक लॅब अद्ययावत करुन तेथील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) माहे जून, २०२१ अखेर बालकांवरील लैंगिक अत्याचार (पोक्सो) संबंधित ११८५ प्रकरणे प्रलंबित असून महिलांवरील गुन्हयासंबंधीच्या डीएनए (३७६ IPC) ची ९२५ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार न्यायसहायक वैज्ञानिक संचालनालयातील गट-अ संवर्गातील ३१ पदे व गट-ब संवर्गातील ५४ रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, गट क व गट ड संवर्गातील १०४ पदे बाहययंत्रणेकडून घेण्यास मान्यता देण्यात आलेली असुन ई-निविदा प्रक्रिया संचालनालयाच्या स्तरावर सुरु करण्यात आलेली आहे.

गट-क संवर्गातील नियमित तत्वावर भरण्यास मान्यता दिलेल्या सरळसेवा कोट्यातील १०२ पदांसाठी आरक्षण निश्चितीच्या प्रस्तावावर संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरु असून सदर पदे नियमित तत्वावर भरण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सदर पदे नियमित तत्वावर उपलब्ध होईपर्यंत करार पध्दतीने भरण्याबाबतचा स्वतंत्र प्रस्तावावर संचालनालयाव्दारे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील होमगार्डच्या गृहरक्षकांची भरती तसेच त्यांना मानधन मिळण्याबाबत

**(३९) * ३२४९९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य आणि पश्चिम रेल्वे उपनगरीय मार्गावरील महिला प्रवाशांची सुरक्षा तसेच स्थानकातील सुरक्षेबरोबरच गरज असेल तेव्हा प्रवाशांना मदत

करण्याकरिता लोहमार्ग पोलिसांना आवश्यक असलेल्या होमगार्डच्या सुमारे २००० गृहरक्षकांची भरती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विविध भागात तैनात असलेल्या होमगार्डला माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मानधन मिळाले नसल्याने होमगार्डनी दिनांक १ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास काम करणे बंद केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मानधनासाठी ३६० कोटी रुपये मंजूर करुन त्यातील १८० कोटी रुपये देण्यात आले असून उर्वरित रक्कम न मिळाल्याने होमगार्ड पुन्हा सेवेत येऊ शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सध्या उपनगरीय लोहमार्ग पोलिसांचे मनुष्यबळ ३९८६ असून त्यापैकी ३२२० पोलीस कर्मचारी तैनात असून कामाचा ताण होत असल्याने लोहमार्ग पोलिसांकडून शासन व होमगार्ड विभागाकडे दोन हजार होमगार्ड देण्याची चार ते पाच वेळा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीनुसार याबाबत शासनाने चौकशी करुन कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रु.३०० कोटीची तरतूद करण्यात आली असून आजतागायत रु.२६१ कोटी एवढी तरतूद वितरीत करण्यात आली आहे.

(४) व (५) रेल्वेच्या मागणीनुसार २००० होमगार्ड रेल्वेला उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयाच्या अनियमित कारभाराबाबत

**(४०) * ३४००८ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके**

**(अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयाच्या गैरकारभारामुळे शेतकरी त्रस्त असल्याची बाब माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या कार्यालयातील कर्मचारी कामांमध्ये टाळाटाळ करित असून नागरिकांशी गैरवर्तन करत असल्याच्या तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या कार्यालयाच्या काही अधिकारी व कर्मचारी यांनी बनावट पीआर कार्ड बनवून कोटयावधीच्या भूखंडाची परस्पर विक्री करुन नियमबाहय कामकाज व गैरव्यवहार केल्याचे दिनांक ८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषीविरुध्द कारवाई करुन भूमिअभिलेख कार्यालयातील कामे सुलभ होण्याबाबत व दोषींवर कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अंशत: खरे आहे. प्रश्न भाग-१ मध्ये नमूद केल्यानुसार तक्रार प्राप्त नाही. तथापि, उप अधिक्षक भूमि अभिलेख, दर्यापूर कार्यालयाच्या कामकाजाबाबत दैनिक देशोन्नती वृत्तपत्रामध्ये दि.०३.०७.२०२१ रोजी प्रकाशित वृत्तास अनुसरून तत्कालिन कार्यालय प्रमुखांनी सर्व अधिनस्त कर्मचाऱ्यांना लेखी समज दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईचे माजी पोलीस आयुक्त यांच्यासह अन्य पोलिसांना निलंबित करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४१) * ३२८८९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्यासह अन्य २५ पोलिसांना निलंबित करण्याचा प्रस्ताव राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी गृह विभागाला दिला असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचे पोलीस महासंचालक यांनी गृह खात्याकडे इतर प्रकरणातील पोलिसांची यादी देखील तयार करून गृह विभागाकडे पाठवली असून सदर यादीत परमबीर सिंह यांच्यासह वेगवेगळ्या प्रकरणात आरोपी असलेले चार उपायुक्त व सहाय्यक उपायुक्तांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १२/०८/२०२१ च्या पत्रान्वये पोलीस सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर केला असून, या प्रस्तावाद्वारे श्री.परमबीर सिंह व २९ पोलीस अधिकारी व कर्मचारी अशा एकूण ३० पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने या गुन्ह्यांचा नि:पक्षपातीपणे तपास करण्यासाठी त्यांना पोलीस सेवेत कार्यरत ठेवणे योग्य होणार नसल्याचे नमूद करुन, त्यांना पोलीस सेवेतून निलंबित करण्याची शिफारस शासनास केली आहे. यामध्ये पाच उपायुक्त दर्जाच्या व पाच सहायक आयुक्त दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रस्तावानुसार गुन्हे दाखल असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यापूर्वी या अधिकाऱ्यांचा

त्यांच्याविरुध्द दाखल गुन्ह्यांमध्ये वैयक्तिकरित्या काय सहभाग आहे, त्यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये प्रत्येक अधिकाऱ्यामार्फत काय अनियमितता घडली आहे, याचा अधिकारी-निहाय तपशील उपलब्ध करुन देण्याचे शासनाकडून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यात आले होते.

पोलीस महासंचालक यांच्याकडून दिनांक ०३/११/२०२१ च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल शासनास प्राप्त झाला असून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने श्री. परमबीर सिंह, भा.पो.से. व श्री. पराग मणेरे, अपर पोलीस अधीक्षक यांना दिनांक ०२/१२/२०२१ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, दिनांक ०२/१२/२०२१ च्या शासन ज्ञापनान्वये श्री.परमबीर सिंह, भा.पो.से. यांची अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९ च्या नियम ८ खाली शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साकीनाका (मुंबई) येथील एका महिलेवर बलात्कार करुन अमानुषपणे केलेली हत्या

**(४२) * ३२५५७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील साकीनाका येथील एका महिलेवर बलात्कार करुन निर्दयीपणे तिची हत्या करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महिलेचा राजावाडी रुग्णालयात उपचार सुरु असताना ३३ तासानंतर मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेनंतर महिलांमध्ये सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्याकरिता शासनातर्फे मुंबई पोलीसांचे निर्भया पथक दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थापन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महिलांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने तरतुद करण्यात आलेला शक्ती कायदा कधी अस्तित्वात येणार आहे, तसेच महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी किंबहुना त्या होऊ न देण्याच्या दृष्टीने तसेच गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, ३२ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार करून तिचा धारदार शस्त्राने खून केल्याची घटना साकीनाका, मुंबई येथे घडली आहे. याबाबत, साकीनाका पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ९३७/२१, भा.द.वि. कलम ३०२, ३७६ (२) (m), ३७६(अ), अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ चे कलम ३ (१) (w), ३ (२) (v), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १०.०९.२०२१ रोजी अटक करण्यात आली असून, सदर आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दिनांक २८.१०.२०२१ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) पिडीत महिलेस राजावाडी रुग्णालय येथे दाखल केले असता दिनांक ११.०९.२०२१ रोजी उपचारा दरम्यान पिडीतेचा मृत्यू झाला आहे.
(३) मुंबई शहरातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १४.०९.२०२१ रोजी पासून महिला अधिकारी व महिला पोलीस अंमलदारांचा समावेश असलेल्या निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
(४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्र. ५१ शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० सदर विधेयक दिनांक १५.१२.२०२० रोजी विधानसभेत मांडण्यात आले होते. सदरहू विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यासंबंधातील प्रस्ताव विधानपरिषदेची सहमती मिळाल्यानंतर दिनांक १५.१२.२०२० रोजी विधानसभेकडून स्वीकृत करण्यात आला. सदर संयुक्त समितीने एकूण १२ बैठका घेतल्या असून, येत्या हिवाळी

अधिवेशनामध्ये संयुक्त समितीचा अहवाल विधानमंडळ सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर निर्भया पथक, पोलीस दीदी, परिणामकारक गस्त, प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला कक्ष, महिला दक्षता समितीची स्थापना करण्यात आली आहे. बृहन्मुंबई शहरातील निर्मनुष्य जागांचे सुरक्षा ऑडीट करण्यात आले असून, बृहन्मुंबई ज्या निर्मनुष्य जागा आहेत अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रकाश व्यवस्था करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, रिलायन्स एनर्जी, बीएसईएस यांच्या एकत्रितपणे उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांना बियाणे व खते मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४३) * ३४६४६ श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील एकूण ७.१५ लाख हेक्टर क्षेत्र पेरणी योग्य असुन यापैकी ६.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीपाची पेरणी होत असताना सर्वाधिक सोयाबीनचा पेरा असलेल्या लातूर जिल्हयासाठी शासनाने ४.५२ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हयात शासनाने केवळ २० हजार क्विंटल महाबीजचे बियाणे उपलब्ध करून दिल्यामुळे उर्वरीत क्षेत्रावर पेरणी करण्यासाठी शेतक-यांना अधिकचा दर देऊन बियाणे व खतांची खरेदी करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना बियाणे व खते मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) लातूर जिल्ह्यात पुरेश्या प्रमाणात अनुदानित रासायनिक खते व सोयाबीन बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## अहमदपूर (जि.लातूर) येथील पोलीस ठाणे व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहतीतील इमारती जीर्ण झाल्याबाबत

**(४४) * ३३०५० श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि.लातूर) येथील पोलीस ठाणे इमारत व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहतीतील इमारती जीर्ण झाल्या असून तेथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना धोकादायक परिस्थितीत रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारती नव्याने बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला असून यासाठी १८ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अंदाजपत्रकास मान्यता देवून नवीन पोलीस वसाहतीच्या इमारतीचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) अहमदपूर, जि. लातूर येथील पोलीस ठाणे इमारत अत्यंत जीर्ण झाली असून, या ठिकाणची शासकीय निवासस्थाने मोडकळीस येऊन, ड्रेनेज पाईपलाईन खराब झाली आहे.
(२) नाही.
(३) व (४) पोलीस अधिक्षक, लातूर यांचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांच्याकडून पोलीस महासंचालक

कार्यालयास दिनांक १.१२.२०२१ रोजी पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला असून, पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## माथेरान (ता.कर्जत, जि. रायगड) येथील जागांच्या खरेदी-विक्री व्यवहारात झालेला गैरव्यवहार

**(४५) * ३२५११ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि. रायगड) येथील अनेक ब्रिटीशकालीन बंगले व जागांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार कोणत्याही प्रकारची दस्तनोंदणी न करताच केवळ जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन करण्यात आल्यामुळे सदर व्यवहारांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन तातडीने अहवाल सादर करण्यास नोंदणी व मुद्रांक शुल्क़ विभागाने जिल्हाधिकारी, रायगड यांना सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथेरान गिरीस्थान नगर परिषदेच्या आसपासच्या परिसरातील भूखंडाचे वाटप दीर्घ मुदतीच्या भाडेपटटयांव्दारे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडून खासगी व्यक्तींना यापूर्वी करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने निष्पादित करण्यात आलेल्या भाडेपट्ट्यांच्या दस्तावर, वाटपपत्र आदेशावर मुद्रांक शुल्क अदा करणे आवश्यक आहे परंतु सदर दस्तांना, वाटपपत्रांवर मुद्रांक शुल्क अदा केले नसल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालावरुन स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने शासनाचा महसुल बुडवणाऱ्यां संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) होय. हे खरे आहे.
(५) सदर दस्तांना मुद्रांक शुल्क अदा केले आहे किंवा नाही यांची पडताळणी करणेसाठी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हानिबंधक यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मशा/जमीन/अ-२/माथेरान/दस्त नोंदणी/तपासणी/आदेश/२०२१, दि.१६.०९.२०२१ अन्वये समिती गठित केलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक यांना प्रलंबित वेतन तातडीने अदा करण्याबाबत

**(४६) * ३३४९९ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड, पालघर, रत्नागिरी, ठाणे, मुंबई व मुंबई उपनगर हया जिल्हयांसाठी एकूण २७३ सुरक्षा रक्षकांच्या तसेच २३ पर्यवेक्षकांच्या नेमणुका मत्सव्यवसाय विभागामार्फत करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्र किनाऱ्यांवर पहारा देणा-या सुरक्षा रक्षकांना मागील ४ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुरक्षा रक्षकांना तातडीने प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर योजनेकरीता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रु.१९९.६१ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला होता. सदर निधीमधून सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक यांचे माहे जानेवारी, २०२१ ते एप्रिल, २०२१ या महिन्यांचे मानधन अदा करण्यात आले आहे. तद्नंतर या योजनेकरीता जुलै, २०२१ च्या पावसाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या पुरक मागणीमधील रु.३८८.०० लक्ष इतका

निधीमधून सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक यांचे माहे, मे, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीतील मानधन अदा करण्यात आले आहे. उर्वरित मानधनाकरीता सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनात पूरक मागणीद्वारे निधीची मागणी वित्त विभागास करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पंतप्रधान कृषी सिंचन 'प्रति थेंब अधिक पीक' योजनेतंर्गत शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत

**(४७) * ३२५७८ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण)** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या पंतप्रधान कृषी सिंचन 'प्रति थेंब अधिक पीक' या योजनेतंर्गत महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून लॉटरी पध्दतीने सुमारे २ लाख ४० हजार ३६६ शेतकऱ्यांची सुक्ष्म सिंचन योजनेसाठी निवड करण्यात आल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान वाटपाची लॉटरी माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आली असून सुमारे २ लाख ४० हजार ३६६ शेतकऱ्यांपैंकी केवळ २५,८२९ शेतकऱ्यांनाच अनुदानाचे वाटप करण्यात आले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना फलोत्पादन संचालक यांनी पत्र पाठवून अनुदान वितरणातील संथ गतीबाबत नाराजी व्यक्त करुन अनुदान वाटपाची कार्यवाही शीघ्रगतीने करण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक ११ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) सन २०२०-२१ मध्ये पंतप्रधान कृषि सिंचन "प्रति थेंब अधिक पीक" योजनेंतर्गत पहिली संगणकीय सोडत माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये पार पडली व तद्नंतरही सोडत प्रक्रिया राबवून एकूण २,५१,४२४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.
त्यापैकी ९१,४२३ लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड केली असून ९०,९१७ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली, पैकी ८६,५९७ लाभार्थ्यांनी संच बसवुन देयके सादर केली, त्यापैकी ८१,०९५ प्रकरणांची मोका तपासणी करुन ते अनुदान वितरणासाठी मंजूर केले आहेत. त्यापैकी ५२,९०१ लाभार्थ्यांना रु. १००.३९ कोटी निधी वितरीत केला आहे व उर्वरित लाभार्थ्यांना निधी वितरणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) संचालक (फलोत्पादन) यांनी योजनेच्या अंमलबजावणीची गती वाढविण्याच्या दृष्टीने सदर प्रशासकीय सूचना दिल्या असून या प्रकरणी चौकशीची आवश्यकता नाही.
केंद्र शासनाच्या सूचनांनुसार निधी वितरणाकरिता PFMS प्रणालीवर SNA Account ची कार्यवाही झाली असून उर्वरीत लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(४८) * ३५२११ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील शेतीच्या पिकांचे माहे जून ते सप्टेंबर, २०२१ मध्ये वा

त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले असून यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीक विम्याचे हप्ते भरले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती पिकांच्या नुकसानीबाबत एकूण २ लाख ११ हजार २४६ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे तक्रारी करुन भरपाई मिळण्याची मागणी केली असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगांव या तालुक्यांसह जिल्हयातील फक्त ७९ हजार शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे पूर्ण झाले असुन सव्वा लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या पिकांचे सर्वेक्षण बाकी असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांच्या पिक विम्याची रक्कम दावे मंजूर करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे** : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत २,७८,१६१ पुर्वसूचना प्राप्त झाल्या असून १०० टक्के शेतकऱ्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहेत.

(४) योजनेअंतर्गत हिंगोली जिल्हयात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत १,३२,९९२ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४२.३४ कोटी निश्चित करण्यात आली असून नुकसान भरपाई निश्चित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांपैकी दि.२२.११.२०२१ अखेर ६५,५८० शेतकऱ्यांना रु.२७.६८ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आले आहे. उर्वरित शेतकरी अर्जदारांचे नुकसान भरपाई निश्चितीची व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली ते कनेरगाव नाका मार्गावर धान्य दुकानासाठी काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला ट्रक पकडल्याबाबत

**(४९) * ३३५७५ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली ते कनेरगाव नाका मार्गावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रास्त धान्य दुकानातील काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला धान्याचा ट्रक पकडला असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धान्याच्या ट्रकमध्ये ४६० पोते गहू पकडल्याचे हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात हिंगोली जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानावरील गहू व तांदूळ काळ्या बाजारात विकताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हिंगोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत गुन्हा दाखल झाल्याची चौकशी करुन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) होय, हे खरे आहे. मनोरा रोडवरील गोदामातून स्वस्त धान्य दुकानाकरीता असलेला ४६० गव्हाच्या पोत्यांनी भरलेला ट्रक काळ्या बाजारात विक्रीकरीता घेऊन जाताना दिनांक ३१.०५.२०२१ रोजी कन्हेरगाव रोडवर हिंगोली पोलीसांकडून कारवाई करून पकडण्यात आला आहे.

सदर प्रकरणी हिंगोली पोलीस ठाणे येथे दिनांक ०१.०६.२०२१ रोजी गु.र.नं. १२७/२०२१, कलम ३, ७ जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) नर्सी ते कडती रोडवर स्वस्त धान्य दुकानातील गव्हाचे २४ कट्टे व तांदळाचे

२० कट्टे असा माल पिकअप व्हॅन मध्ये आढळून आल्याने दिनांक ०४.०७.२०२१ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, हिंगोली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नर्सी नामदेव पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६४/२०२१ कलम ३, ७ जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर दोन्ही प्रकरणात एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गु.र.नं.१२७/२०२१ मध्ये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गु.र.नं.६४/२०२१ मध्ये पुढील तपास सुरु आहे. सदर प्रकरणात अधिक पुरावा हस्तगत करण्यासाठी तपास सुरू आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी महिलेची नियम डावलून बदली केल्याबाबत

**(५०) * ३३०८५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी महिलेची नियम डावलून बदली केल्याप्रकरणी दाद मागण्यासाठी ती महिला प्रांत अधिकारी, येवला यांच्याकडे गेली असता प्रांत अधिकाऱ्यांनी शरीर सुखाची मागणी केल्याचे दिनांक १६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) उप विभागीय अधिकारी, येवला जि.नाशिक यांच्या प्रशासकिय नियंत्रणखालील तलाठी महिलेने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा महिला तक्रार निवारण समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, येवला यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे पोलिसांनी विशेष मोहिम आखून अंमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यांना अटक केल्याबाबत

**(५१) * ३४०८७ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे पोलिसांनी विशेष मोहिम आखून अंमली पदार्थ विक्री तसेच सेवन करणाऱ्यांविरुध्द ९३ गुन्हे दाखल करुन सुमारे १४० जणांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी आरोपींची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी सन २०२१ मध्ये माहे जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत एकूण १७५ गुन्हे दाखल करून त्यामध्ये एकूण २१८ आरोपितांना अटक केली आहे. सदर १७५ गुन्हयांपैकी १३१ गुन्हयांची दोषारोपपत्रे मा. न्यायालयात सादर करण्यात आली असून ४३ गुन्हे पोलीस तपासाधीन आहेत व १ गुन्हा शाबित आहे.

पोलीस अधीक्षक, ठाणे(ग्रामीण) यांच्या कार्यक्षेत्रात सन २०२० मध्ये १ गुन्हा व सन २०२१ मध्ये ३ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण ७ आरोपी निष्पन्न झाले आहेत. त्यापैकी ५ आरोपितांना अटक करण्यात आलेली आहे व त्यांच्याविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुरुर (ता.वाई, जि.सातारा) येथील स्मशानभूमीत मुलीची अघोरी पूजा केल्याबाबत

**(५२) * ३२९९० डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरुर (ता.वाई, जि.सातारा) येथील स्मशानभूमीत मुलीची अघोरी पूजा करण्याबाबतचा प्रकार माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेसंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, सदर घटनेबाबत भुईंज पोलीस स्टेशन, जि.सातारा येथे गु.र.क्र. २२७/२०२१ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम - २०१३ चे कलम ३ (२) प्रमाणे सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींना जामिन मंजूर झाला असून त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेरुळ (नवी मुंबई) येथील एका पंधरा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(५३) * ३५६३५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई) येथील एका पंधरा वर्षीय मुलीला इंजेक्शन देऊन बेशुध्द करुन दोन तरुणांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याबाबतचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पीडितेच्या मैत्रिणीनेच शीतपेयामधून दारु पाजून तिला आरोपींच्या ताब्यात दिल्याची माहिती दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त आरोपींना अटक करण्यात आली आहे काय, तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) सदर प्रकरणात फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नेरूळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२४/२०२१ भा.दं.वि. कलम ३६३, ३२८, ३४२, ३७६ (२) (आय), ३४, लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ८, १७, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ कलम ४, ५ चे क, ख, ग, घ (एक) प्रमाणे दिनांक ११.०९.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये पिडीत मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(२) होय, पिडीतेच्या मैत्रिणीने शितपेयातून गुंगीकारक पेय दिल्याचे आणि पिडीतेस रिक्षातून घेऊन गेल्याचे साक्षीदारांच्या जबाबातून समोर आलेले आहे.

(३) याबाबत नवी मुंबई आयुक्तालयांतर्गत नेरूळ पोलीस ठाणे येथे विधीसंघर्षित बालिका आणि दोन अज्ञात इसम यांचे विरूध्द गु.र.क्र. ३२४/२०२१ भा.दं.वि. कलम ३६३, ३२८, ३४२, ३७६ (२) (आय), ३४, लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ८, १७, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ कलम ४, ५ चे क, ख, ग, घ (एक) प्रमाणे दिनांक ११.०९.२०२१ रोजी गुन्हा नोंद केलेला आहे.

सदर गुन्ह्यातील विधीसंघर्षित बालिका हिस दिनांक २०.१०.२०२१ रोजी ताब्यात घेऊन त्याच दिवशी मा. बालन्यायमंडळ, भिवंडी यांचे समोर हजर केले असता, मा. बालन्यायमंडळ, भिवंडी यांनी दिनांक २८.१०.२०२१ रोजी रू. ७,०००/- जामीनावर मुक्त केले आहे.

सदर गुन्ह्यात विधीसंघर्षित बालिका हिचेविरूध्द भा. द. वि. कलम ३६३, ३२८, ३४२, ३४ अन्वये मा. बाल न्यायमंडळ, भिवंडी, जि. ठाणे येथे दिनांक १६.११.२०२१ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कासारवडवली (जि.ठाणे) परिसरात सहाय्यक आयुक्त, ठाणे मनपा यांच्यावर अनधिकृत फेरीवाल्यांनी प्राणघातक हल्ला केल्याबाबत

**(५४) * ३२८९३ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासारवडवली (जि.ठाणे) या भागात अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास गेलेल्या ठाणे महापालिकेच्या माजिवडा प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सहाय्यक आयुक्त यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांची तीन बोटे तुटली असून त्यांच्यासोबत असलेले कर्मचारीसुद्धा हल्ल्यात जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात माहे जानेवारी ते जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ६० ठिकाणी शासकीय-निमशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्यावर अनधिकृत फेरीवाल्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडल्या असून मागील ४ वर्षांमध्ये ६०५ जणांवर हल्ले झाले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित आरोपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) होय,

ठाणे महापालिकेच्या माजिवडा प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती. कल्पिता पिंपळे यांच्यावर दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी १८.३० वाजता प्राणघातक हल्ला करण्यात आला. सदर हल्यात श्रीमती. कल्पिता पिंपळे यांची दोन बोटे तुटली असून डोक्याच्या डाव्याबाजूस मार लागला आहे. तसेच श्री.सोमनाथ पालवे यांचेवर देखील हल्ला झाल्याने त्यांचेही एक बोट व हाताच्या मनगटावरील बाजूस दुखापत झालेली आहे. सदर प्रकरणात कासारवडवली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२९५/२०२१ भा.द.वि. क्र.३०७,३५३,३३२,३३३ सह कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा, सह कलम ३७(१), १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी याला अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणात पुढील तपास सुरु आहे.

(३) व (४)

ठाणे महापालिका क्षेत्रात शासकीय-निमशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्यावर अनधिकृत फेरीवाल्यांनी हल्ला केल्याच्या घटनांवर केलेल्या कार्यवाही पुढीलप्रमाणे.

| वर्ष | गुन्हे दाखल | गुन्हे उघड | हल्ले | | अटक आरोपी |
|---|---|---|---|---|---|
| | | | कर्मचारी | अधिकारी | |
| २०१८ | ० | ० | ० | ० | ० |
| २०१९ | ३ | ३ | ३ | ० | ५ |
| २०२० | ० | ० | ० | ० | ० |
| ऑक्टोबर, २०२१ पर्यंत | २ | २ | २ | १ | ५ |

सदर गुन्ह्यातील सन २०१९ मध्ये तीन व २०२१ मध्ये दोन असे एकूण पाच गुन्हे दाखल असून त्यामध्ये १० आरोपींना अटक करण्यात आले आहेत.

सदर गुन्ह्यातील ४ गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. पाच गुन्ह्यातील १० आरोपींपैकी सहा आरोपींविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुंबई उपनगरातील मढ आयलंड, शांतीनगर (मालाड प.) येथील एरंगल गावातील शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(५५) * ३२७१३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प.) मढ आयलंड, शांतीनगर येथील एरंगल गावातील सिटी सर्व्हे क्र.१८०९ वरील २०२३ चौ.मी. क्षेत्रफळाची शासकीय जमीन फारुख पटेल व अन्य व्यक्तींनी अतिक्रमण करुन परस्पर इतरांना दीड कोटी रुपयास विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय जमीनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असताना सदर जमीनीवर अतिक्रमण करुन बेकायदा विक्री झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी अतिक्रमण धारकांवर कठोर कायदेशीर कारवाई करुन सदरहू जमीन तात्काळ शासनास जमा करण्याचे आदेश निर्गमित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :**

(१) व (२) मौजे एरंगळ गावातील न.भू.क्र.१८०९ (पै) २०२३ चौ.मी. क्षेत्रफळाच्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास दि.२६/०२/२०२१ रोजी प्राप्त झाली आहे.

(३) मौजे एरंगळ, ता. बोरीवली येथील सर्व्हे नं.१६, न.भू.क्र.१८०९ या शासकीय मिळकतीवर अतिक्रमण करणाऱ्यांविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ४४१ व ४४७ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२० अन्वये दिनांक १५/०७/२०२१ रोजी मालवणी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र.१०४६/२०२१ दाखल करण्यात आला आहे.

तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, उप जिल्हाधिकारी, (अति./निष्का.) मालाड-२, नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव व मालवणी पोलीस ठाणे यांनी दिनांक १९/०७/२०२१ रोजी या शासकीय मिळकतीवरील अनधिकृत २ पक्की बांधकामे व ४ गाळे निष्कासित केली आहेत.

या शासकीय मिळकतीवरील निष्कासनाच्या कारवाईनंतर सदर शासकीय मिळकतीवर, "सदर मिळकत ही शासकीय असल्याने, अतिक्रमण करणाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल" असा फलक लावण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मोकळ्या झालेल्या शासकीय मिळकतीच्या संरक्षणासाठी दिनांक १०/०९/२०२१ रोजी तारेचे कुंपण घालण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दहशतवाद विरोधी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५६) * ३२६३५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहशतवाद विरोधी विभागातील शंभरहून अधिक जागा रिक्त असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांमध्ये जवळपास ५० पदे ही अधिकारी दर्जाची , ५० हून अधिक पदे ही कॉन्स्टेबल दर्जाची रिक्त आहेत तर मुंबई एटीएस दलात एकुण ०५ एसीपी दर्जाची अधिकारी पदे असून एकाही पदावर सध्या नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती उक्त विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) राज्यातील दहशतविरोधी पथकासाठी एकूण ७१३ मंजूर पदे असून, त्यापैकी ५४१ पदे कार्यान्वित आहेत व १७२ पदे रिक्त आहेत. सदरहू १७२ रिक्त पदांमध्ये ११६ अधिकारी व ५६ अंमलदाराचा

समावेश आहे.

(३) व (४) पोलीस प्रशासनातंर्गत पदोन्नतीची सर्व पदे भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. या व्यतिरिक्त दहशतवाद विरोधी पथकातील अंमलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित पोलीस आयुक्त यांना निर्देश देण्यात आले आहे.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथे खाजगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षकाने आठ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(५७) * ३४१२६ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे खाजगी शिकवणी घेणाऱ्या एका शिक्षकाने आठ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार बाजारपेठ पोलीस स्थानकात दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास नोंदविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकास पोलीसांनी अटक करुन त्याचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, याबाबत बाजारपेठ (कल्याण) पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३४५/२०२१ दिनांक २२.०९.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) बाजारपेठ (कल्याण) पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र. ३४५/२०२१ मध्ये आरोपीस दिनांक २२.०९.२०२१ रोजी अटक करण्यात आली असून, दिनांक १५.११.२०२१ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) याबाबत बाजारपेठ (कल्याण) पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३४५/२०२१, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम ७,८,१०,१२ अन्वये दिनांक २२.०९.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील ११ वर्षांच्या मुलीच्या कौमार्याचा व्यवहार केल्याप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(५८) * ३३००४ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील ११ वर्षांच्या मुलीच्या कौमार्याचा प्रौढ ग्राहकाशी ४० हजार रुपयांना व्यवहार केल्याप्रकरणी तीन महिलांना गुन्हे शाखेच्या पथकाने माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध देहविक्रीत सहभागी असलेल्या अनेक टोळ्या नागपूरात कार्यरत असून शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास त्यानुसार अशा टोळ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) कोराडी पोलिस स्टेशन, नागपूर शहर येथे गु. र. क्र ३१३/२०२१, भा. दं. वि. कलम ३६६ (अ), ३७०, ३७० (अ), ३४, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यात ३ महिला आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) नागपूर पोलीस आयुक्तालय आणि नागपूर पोलीस अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रात देह विक्रीत सहभागी असलेल्या टोळ्या कार्यरत नाहीत. लपून छपून अनैतिक मानवी व्यापार करण्याच्या प्रकारास आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून छापे घालून कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.